# <u>बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज, बार्शी</u>

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग अहवाल 2020-21

राष्ट्रीय सेवा योजना विभागामध्ये समाजसेवा व श्रम प्रतिष्ठा ही मूल्ये रुजविण्यासाठी कार्य करतो निस्वार्थ सेवा भाव करण्यासाठी विभाग **‘Not Me But You’** ब्रीद वाक्य घेऊन ते सार्थ ठरविण्यासाठी स्वत:साठी जगता जगता दुसऱ्यांसाठी काहीतरी करावे ही भावना विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्याचा सतत प्रयत्न करतो.

सन 2020-2021 या शैक्षणिक वर्षांमध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागांमध्ये 88 मुली व 85 मुले होती अशा एकूण 173 महाविद्यालयीन स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला . या विभागाचा या वर्षाचा उद्घाटन समारंभ दिनांक 1 ऑगस्ट 2020 रोजी माननीय प्राचार्य डॉ . एस. के. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला . उद्घाटन प्रसंगी प्रमुख उपस्थिती म्हणून प्राध्यापक डॉ . शिखरे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेची उद्दिष्टे विशद करून आजच्या covid-19 च्या काळात ही उद्दिष्टे जोपासण्यासाठी चे महत्त्व विद्यार्थ्यांना ऑनलाइन स्वरूपात पटवून सांगितले . या विभागाअंतर्गत दिनांक 1 ऑगस्ट 2020 रोजी सोलापूर विद्यापीठ सोलापूर वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

दिनांक 20 ऑगस्ट 2020 रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत सद्भावना दिवस साजरा करण्यात आला.

दिनांक 5 सप्टेंबर 2020 रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत सर्व शिक्षकांनी प्रती आदर व्यक्त करण्यासाठी शिक्षक दिनाचे आयोजन करण्यात आले होते.

दिनांक 1 ते 7 ऑक्टोबर 2020 या कालावधीत राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन महात्मा गांधी जयंती सप्ताह हा ‘महात्मा की महिमा’ या नावाने साजरा करण्यात आला.

दिनांक 25 डिसेंबर 2020 रोजी महाविद्यालयात सुशासन दिवस साजरा करण्यात आला . या दिनाचे औचित्य साधून सर्वांनी एकात्मिक शपथ घेतली यासाठी सर्व सेवकांनी ऑनलाइन उस्फुर्त सहभाग घेतला.

दिनांक 12 जानेवारी 2021 रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय युवा दिन तथा स्वामी विवेकानंद जयंती मासाहेब जिजाऊ जयंती निमित्त थोर महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले.

दिनांक 25 जानेवारी 2021 रोजी राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्यात आला यानिमित्ताने निकोप लोकशाही समृद्धी करण्यासाठी युवकांना शपथ देण्यात आली.

रासेयो विभागाच्यावतीने रक्तदान शिबिराचे आयोजन दिनांक 11 जानेवारी 2021 रोजी करण्यात आले. यामध्ये ३९ स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला.

दिनांक 16 फेब्रुवारी 2021 रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने हुंडाबळी चळवळी अंतर्गत वाद-विवाद व परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये आमच्या स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला.

दिनांक 25 जानेवारी 2021 रोजी प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने आणि दिनांक 7 फेब्रुवारी 2019 रोजी कर्मवीर जयंती सप्ताह समाप्ति निमित्त्याने महाविद्यालय परिसर स्वच्छता स्वयंसेवकांच्या मदतीने covid-19 चे सर्व नियम पालन करत करण्यात आली.

दिनांक 8 मार्च 2021 रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करण्यात आला.

.

या शैक्षणिक वर्षांमधील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने विविध इतर उपक्रम ही यशस्वीपणे राबविण्यात आले आहेत. त्यामध्ये वृक्ष लागवड व वृक्ष संवर्धन , माझी वसुंधरा अभियान , covid-19 जाणीव जागृती, माझे कुटुंब माझी जबाबदारी , लसीकरण जाणीवजागृती , पल्स पोलिओ मोहिमेत सहभाग , रस्ता सुरक्षा अभियान , योगा प्रशिक्षण कार्यक्रम , यासारखे उपक्रम या वर्षभरात घेण्यात आले . यासाठी सर्व विभागातील शिक्षक विद्यार्थ्यांना नेहमीच उत्तम कामगिरीसाठी प्रेरणा व प्रोत्साहन देत आले आहेत.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ . एस. के. पाटील तसेच सर्व प्राध्यापक बंधू व भगिनी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

**कार्यक्रम अधिकारी**

**प्रा. डॉ. संतोष जामगे**
**प्रा. एम. एन. मोरे**

<u>**संविधान शपथ ग्रहण 26/11/2020**</u>





**रक्तदान शिबिर 11/01/2021**



**सुंधरा शपथ ग्रहण 31/01/2021**



**<u>वृक्षसंवर्धन 15/02/2021</u>**



**कॉलेज परिसर स्वच्छता 25/01/2021**



**वृक्षारोपण 03/02/2021**

